सातारा जिल्हा परिषद,सातारा
**बांधकाम विभाग उत्तर,**
कार्यालयाचा पत्ता - जिल्हा परिषद मुख्य इमारत,1 ला मजला,सातारा - कोरेगाव रोड सदर बझार कॅम्प ता.जि.सातारा.
Email ID - eendsatarazp@gmail.com
दुरध्वनी क्र. 02162-238190

जा.क्र.बांध(उ)/आस्था-1/कावि/बजेता/क्र. जेष्ठता/2022 दिनांकः 9 .05.2023

प्रति,

1. कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग दक्षिण/लघु पाटबंधारे विभाग,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,सातारा जिल्हा परिषद,सातारा.
2. गट विकास अधिकारी,पंचायत समिती सातारा,कोरेगांव,खटाव,माण,फलटण,खडाळा, वाई,महाबळेश्वर,जावली,पाटण,कराड (सर्व-11)
3. उप अभियंता,जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग सातारा,कोरेगाव,खटाव,माण,फलटण, खडाळा,वाई,महाबळेश्वर,जावली,पाटण,कराड (सर्व-11)
4. उप अभियंता,जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग सातारा,खटाव,फलटण,कराड (सर्व-4)
5. उप अभियंता,जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग सातारा,कोरेगाव,खटाव, माण, फलटण व खडाळा,वाई,जावली व महाबळेश्वर,पाटण,कराड (सर्व-09)

विषय - तांत्रिक संवर्गातील कर्मचा-यांचे जिल्हातंर्गत प्रशासकीय / विनंती / आपसी बदल्यांच्या तात्पुरती जेष्ठता यादी प्रसिध्दीबाबत...

संदर्भ - 1. ग्राम विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक.जिपब-414/प्र.क्र.112/ आस्था-14, दिनांक 15 मे 2014
2. ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक.जिपब-414/प्र.क्र.112/ आस्था-14, दिनांक 02 जुलै 2014
3. ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक.जिपब-816/प्र.क्र.136/ आस्था-14, दिनांक 02 जानेवारी 2017
4. ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक.जिपब-817/प्र.क्र.228/ आस्था-14, दिनांक 07 मार्च 2019
5. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र),सातारा जिल्हा परिषद,सातारा यांच्याकडील जा.क्र.आस्था-2(5)/मविसे/2022 दि.06.04.2022

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, तांत्रिक संवर्गातील कनिष्ठ / शाखा अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गाची संदर्भीय शासन निर्णयानुसार प्रशासकीय / विनंती / आपसी बदलीची तात्पुरती वास्तव्य जेष्ठता यादी बांधकाम विभाग उत्तर या कार्यालयाचे नोटीस बोर्डवर व जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कनिष्ठ / शाखा अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गातील सर्व कर्मचा-यांनी प्रसिध्द केलेली तात्पुरती वास्तव्य जेष्ठता यादीचे अवलोकन करावे. सदर यादीवर आक्षेप व हरकती असल्यास पुराव्यासह दिनांक 12.05.2022 पुर्वी लेखी स्वरुपात या कार्यालयास संबंधित आस्थापना लिपीकाने समक्ष सादर करण्याची दक्षता घ्यावी. आक्षेप व हरकत नसल्यास निरंक म्हणून कळविण्यात यावे. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप व हरकतींचा विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

सदरच्या तात्पुरती वास्तव्य जेष्ठता यादी सर्व कनिष्ठ / शाखा अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांच्या निदर्शनास आणून त्याची दिनांकीत स्वाक्षरी घेऊन पोहोच आपल्या दप्तरी जतन करुन ठेवण्यात यावी.

सोबत - प्रशासकीय / विनंती / आपसी वास्तव तात्पुरती जेष्ठता यादी.

**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग उत्तर**
**सातारा जिल्हा परिषद,सातारा**

प्रत - मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद,सातारा यांना माहितीसाठी.

प्रत - मा.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा यांना माहितीसाठी.

प्रत - उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र), सातारा जिल्हा परिषद, सातारा यांना माहितीसाठी.